# डॉ. वर्धमान कांकरियांचा परिचय

डॉ.प्रकाश –डॉ.सौ.सुधा यांनी साईसूर्य नेत्रसेवा या संस्थेचा पाया रचला. यशाची अनेक मजले उभे केले. आणि त्यावर आता सोनेरी कळस चढविण्याचे कार्य **डॉ. वर्धमान** कांकरिया हे करीत आहेत. डॉ.वर्धमान यांचे शालेय शिक्षण अहमदनगर येथील भाऊसाहेब फिरोदिया हायस्कुमध्ये झाले. १२ वीत ते बोर्डात ११ वे आले. मेडिकल प्रवेश परीक्षेत पुणे विभागात पहिले व महाराष्ट्रात १६ वे आले. त्यानंतर ख्यात किर्त G.S.Medical College(K.E.M.Hospital) मुंबई येथे त्यांनी M.B.B.S. पर्यंतचे शिक्षण घेतले. त्या कालावधीत त्यांनी Ophthalmology (नेत्रशास्त्र) या विषयात महाराष्ट्रात सर्वाधिक गुण मिळवले. त्यांना आय.सी.एम.आर. रिसर्च स्कॉलरशिप, जे आर डी टाटा स्कॉलरशिप तसेच जोगळेकर – अंबरडेकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. एम.बी.बी.एस. चे शिक्षण घेत असताना डॉ.वर्धमानने त्याचे गुरु डॉ. रुमी जहांगीर यांच्या मार्गदर्शनाखाली शोधनिबंध सादर केला. कॉलेज जिवनात त्यांनी अनेक बक्षिसे मिळविली. Most Successful Person 20 years down the line आणि Best Allrounder of the batch G.S.Medical College(K.E.M.Hospital) च्या वतीने डॉ. वर्धमान यांना सन्मानित करण्यात आले आहे.

त्यानंतर डॉ. वर्धमान यांनी चेन्नई येथील अतिशय ख्यातनाम शंकर नेत्रालय येथे नेत्रशास्त्राची DNB पदवी प्राप्त केली. शंकर नेत्रालय येथे डॉ. वर्धमानला Kanthi Mathi Nathan Goldmedal ने सन्मानित करण्यात आले. अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय क्वीजमध्ये मोठे यश प्राप्त झाले आणि Allergan Academic Achievers Award ने गौरविण्यात आले. FRCS Part I व Part II परीक्षा मध्येही त्यांनी प्राविण्य मिळविले आहे .त्यापुढे डॉ. वर्धमान यांनी चेन्नई येथे बुबुळांचे आजार, निदान, आणि शस्त्रक्रिया (Cornea & Ocular Surface) आंतरराष्ट्रीय किर्तीचे कृत्रिम नेत्ररोपण शस्त्रक्रियेचे भारतातील जनक डॉ.एस.के.राव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतले. त्या काळात केलेल्या संशोधनाची बिजींग येथे झालेल्या Asia Pacific Academy Of Ophthalmology (आशिया खंडातील नेत्रतज्ञानांची सर्वात मोठी परिषद) येथे शोधनिबंध सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. त्या परिषदेत त्यांना Prof. Yasuo Tano Award या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार प्राप्त करणारे भारतातील पहिले व सर्वात तरूण नेत्रतज्ञ होत. लहान मुलांवर लेसर शस्त्रक्रियेने चष्म्याचा नंबर घालविण्याच्या शस्त्रक्रियेबद्दलच्या त्यांच्या शोधनिबंधाला शिकागो (अमेरीका) येथे संपन्न झालेल्या अतिशय प्रतिष्ठीत American Academy Of Ophthalmology साठी निमंत्रित करण्यात आले.

लहान मुलांमध्ये दोन्ही डोळयांमध्ये चष्म्याच्या नंबरमध्ये असलेली तफावत जास्त नंबर असलेल्या डोळयाला आळशी बनवते अशा रूग्णांमध्ये लेसर किरणांचा उपयोग करून डोळा आळशी होण्यापासून वाचवता येतो आणि नैसर्गिक दृष्टी टीकवता येते. या शोधनिबंधाचे कौतुक अमेरिकेतील अतिशय नामवंत असे Prof. Soni Yoo, Dr Diniel Durri, Dr. Margaret Macdonald व इतर नेत्रतज्ञानी केले. त्यावेळेस लेसर शस्त्रक्रियेचे जनक जगविख्यात Prof. Ioannis Pallikaris हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. डॉ वर्धमान यांनी सादर केलेल्या या शोधनिबंधाने ते भारावून गेले व अत्यंत लहान वयात मोठे काम करणाऱ्या या तरूण नेत्रतज्ञाला त्यांनी ग्रीस येथे त्यांच्या नेत्रसंशोधन प्रयोग शाळेत संशोधन कार्यासाठी (Research Fellowship) साठी आमंत्रित केले.

ग्रीस येथे अशा प्रकारचे प्रशिक्षण घेणारे डॉ. वर्धमान हे भारतातील पहिले व सर्वात तरूण नेत्रतज्ञ ठरले. या प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांनी १६ विविध संशोधनामध्ये पुढाकार व सहभाग घेतला. त्यामध्ये विशेषत: जगातील सर्वात प्रगत Femto second Laser चा नेत्रशस्त्रक्रियेत उपयोग, चाळीशीचा चष्मा घालविण्याच्या शस्त्रक्रिया, विनाटाक्याच्या नेत्ररोपण, एका बुबुळापासून दोन अंध व्यक्तींना दृष्टी देण्याचे तंत्रज्ञान यांच्यावर संशोधन व विशेष अभ्यास करण्यात आला. या संशोधनाची आंतरराष्ट्रीय किर्तीच्या Journal Of Refractive Surgery (USA), Journal Of American Association Of Paediatric Ophthalmology USA, Eye ( Royal College of Surgeons UK), Cornea (USA) येथे प्रकाशनासाठी निवड करण्यात आली. त्यांच्या कार्याची दखल घेऊन International Society Of Refractive Surgery या संस्थेने Reviewer या पदावर नेमणूक करण्यात आली. अमेरिका येथील जगप्रसिध्द् Baskan Palmer Institute of Ophthalmology Miami (USA) येथे Fellowship on Flemto Laser for Catract and Refractive Surgery पूर्ण करण्याचा मान त्यांना प्राप्त झाला त्याकाळातही त्यांनी अनेक संशोधन कार्यात लक्षणीय सहभाग नोंदविला.

हे सर्व करत असतानाच डॉ वर्धमान यांनी खेळ व संगीत यामध्ये नैपूण्य मिळविले. ते टेबल टेनिस या खेळात राज्यपातळीवरील खेळाडू होते तसेच हार्मोनिअम, पियानो, मँडोलिन व माऊथ ऑर्गन सारखी वाद्य वाजविण्यात प्राविण्य मिळविले. आता साई सूर्य नेत्रसेवा येथे कार्य करतांना आपल्या सुविद्य पत्नी डॉ. श्रुतिका यांच्या समवेत पुणे येथे एशियन आय हॉस्पिटलची उभारणी करून दोन वर्षात राज्यस्तरीय बेस्ट आय हॉस्पिटलचे पारितोषीक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते स्विकारले. ८मार्च २०११ रोजी चष्मा घालविण्याच्या लेसर शस्त्रक्रिया करण्याच्या त्यांच्या सेवेची नोंद लिम्का बुकनेही घेतली आहे. आठ तासात १०० लेसर नेत्रशस्त्रक्रिया करणारे सर्वात तरूण नेत्रतज्ञ म्हणून त्यांची नोंद झाली आहे.

---

**Dr Vardhaman Kankariya** Asian Eye Hospital Pune
Phone 02026162424 email chairman@asianeyehospital.com
Visit us at : www.asianeyehospital.com